महाराष्ट्र शासन

स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

कोकण भवन,सहावा मजला,नवी मुंबई ४०० ६१४

☏ 🖷:- -022,27571391. E.Mail:- calfak6@yahoo.com


## कार्यालयीन आदेश क्रमांक ३ दिनांक 4 JAN 2010

विषयः- ग्रामपंचायत लेखापरीक्षण कार्यपध्दती निश्चित करणेबाबत.

ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षणासाठी कनिष्ठ लेखापरीक्षक / वरिष्ठ लेखापरीक्षकांची नियुक्ती करणेबाबत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

जिल्हा उपमुख्य लेखापरीक्षक यांनी विभागीय सहमुख्य लेखापरीक्षक यांच्या सहमतीने कार्यक्रम द्यावा. यासाठी सहमुख्य लेखापरीक्षक यांनी चक्रीय पध्दतीने (Rotation) कार्यपध्दती अवलंबून ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण करून घ्यावे. त्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायत निहाय मागील ५ वर्षात कोणी लेखापरीक्षण केले याची माहिती संकलित करून ज्या लेखापरीक्षकांनी ज्या ग्रामपंचायतीमध्ये लेखापरीक्षण केले नसेल अशांना प्रथम ओळीने त्या ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण द्यावे. दरवर्षी वेगळ्या लेखापरीक्षकांना लेखापरीक्षणासाठी पाठवावे. प्रत्येक ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण करण्याची संधी सर्व कनिष्ठ लेखापरीक्षक व वरिष्ठ लेखापरीक्षक यांना मिळेल याची दक्षता घ्यावी.

(माणिक कौरथी)
मुख्य लेखापरीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य

प्रत:-

१. सहमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा,
मुंबई / नाशिक / पुणे / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

२. उपमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा,
जिल्हा -----------------.

वि com hcl ASA letter १११०